शनिवार, दि. ७ मार्च २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १८६ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# पैसे भरल्याशिवाय परीक्षा नाही!

## इंग्रजी माध्यम शाळांची दादागिरी; विद्यार्थ्यांना परीक्षेत बसू न देण्याचे प्रकार

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात सध्या वार्षिक परीक्षांचा कालावधी सुरू असून इयत्ता पाचवी ते नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या अंतिम परीक्षा विविध शाळांमध्ये घेतल्या जात आहेत. मात्र या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर इंग्रजी माध्यमांच्या काही खासगी शाळांचा मनमानी कारभार समोर येत आहे. शाळेची पूर्ण फी व डोनेशन भरले नसलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा देऊ दिली जात नसल्याचे प्रकार उघड होत असून पालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अनेक शाळांकडून ज्या विद्यार्थ्यांची फी पूर्ण भरलेली आहे त्यांनाच परीक्षेला बसू देण्यात येत आहे. ज्या विद्यार्थ्यांच्या फीमधील काही रक्कम बाकी आहे, त्यांना ''पहिले फी भरा, नंतरच परीक्षा देता येईल'' असा दम दिला जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे ही सूचना पालकांना न देता थेट विद्यार्थ्यांनाच दिली जात असल्याचे समोर आले आहे. परिणामी विद्यार्थी आणि पालक दोघेही मानसिक तणावात सापडले आहेत.

**विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर परिणाम**

शाळा प्रशासनाकडून थेट विद्यार्थ्यांना फी भरण्याबाबत ताकीद दिली जात असल्याने लहान मुलांवर मानसिक दबाव येत आहे. परीक्षेच्या काळातच अशा प्रकारे विद्यार्थ्यांना अडवणे हे त्यांच्या आत्मविश्वासावर परिणाम करणारे असल्याचे शिक्षणतज्ज्ञांचे मत आहे. काही विद्यार्थ्यांना वर्गातच ''फी बाकी असल्याने परीक्षेला बसू नका'' असे सांगितल्याने त्यांना लाजिरवाणी परिस्थितीला सामोरे जावे लागत असल्याचेही पालकांनी सांगितले.

**पालकांशी संपर्क साधणे अपेक्षित**




प्रवेश प्रक्रियेदरम्यान शाळा प्रशासन पालकांचे मोबाईल क्रमांक व संपर्क तपशील घेत असते. त्यामुळे फी संदर्भातील कोणतीही समस्या असल्यास थेट पालकांशी संवाद साधणे अधिक योग्य ठरले असते. मात्र त्याऐवजी विद्यार्थ्यांवर दबाव टाकणे आणि त्यांना परीक्षेत बसू न देणे ही बाब संतापजनक असल्याची प्रतिक्रिया पालकांकडून व्यक्त होत आहे.

**सर्वच शाळांमध्ये कमी-अधिक प्रमाणात प्रकार**

हा प्रकार केवळ एका शाळेपुरता मर्यादित नसून जिल्ह्यातील अनेक इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये कमी-अधिक प्रमाणात अशीच परिस्थिती असल्याचे समोर येत आहे. काही ठिकाणी विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर बसवणे, तर काही ठिकाणी परीक्षा पेपर देण्यास नकार देणे असे प्रकारही घडल्याची चर्चा आहे.

**शिक्षण विभागाच्या भूमिकेकडे लक्ष**

या गंभीर प्रकाराकडे शिक्षण विभागाने तातडीने लक्ष देण्याची मागणी पालकांकडून होत आहे. संबंधित शाळांची तपासणी करून विद्यार्थ्यांना परीक्षेत बसण्यापासून रोखणाऱ्या शाळांवर कारवाई करावी, अशी मागणी पालकांनी केली आहे. तसेच कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची खात्री शिक्षण विभागाने करून घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**पालकांचा इशारा**

दरम्यान, अशा प्रकारे विद्यार्थ्यांना परीक्षेत बसू न दिल्यास पालक संघटना एकत्र येऊन शिक्षण विभागाकडे लेखी तक्रार देण्याचा इशाराही देत आहेत. शिक्षण हे विद्यार्थ्यांचे मूलभूत अधिकार असून फीच्या कारणावरून परीक्षा रोखणे हे अन्यायकारक असल्याचे पालकांचे म्हणणे आहे.

विद्यार्थ्यांची फी बाकी असल्याच्या कारणावरून त्यांना परीक्षेला बसू न देणे हे शिक्षणाच्या हक्काच्या तत्त्वाला बाधक मानले जाते. Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 (RTE) नुसार ६ ते १४ वयोगटातील मुलांना शिक्षणाचा मूलभूत हक्क आहे आणि त्यांचे शैक्षणिक नुकसान होईल असे निर्णय घेणे योग्य नाही. Maharashtra School Education Department च्या मार्गदर्शक सूचनांनुसार शाळांनी विद्यार्थ्यांवर कोणत्याही प्रकारचा मानसिक दबाव टाकू नये. फी बाकी असल्यास शाळा पालकांशी संवाद साधू शकते किंवा नियमानुसार वसुलीची प्रक्रिया करू शकते; मात्र विद्यार्थ्याला परीक्षेत बसण्यापासून रोखणे किंवा वर्गात अपमानास्पद वागणूक देणे अनुचित मानले जाते. शिक्षण तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारे विद्यार्थ्यांना परीक्षेत बसू न देणे हे त्यांच्या मानसिक आरोग्य आणि शैक्षणिक प्रगतीवर प्रतिकूल परिणाम करणारे आहे. त्यामुळे अशा तक्रारी आल्यास शिक्षण विभाग चौकशी करून संबंधित शाळांवर कारवाई करू शकतो, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# दुबईत तणाव; हजारो भारतीय अडचणीत

## केंद्र सरकारने तात्काळ मदत करावी : खासदार डॉ. काळे

**जालना । प्रतिनिधी -** दुबईमध्ये अचानक निर्माण झालेल्या युद्धजन्य तणावपूर्ण परिस्थितीत हजारो भारतीय नागरिक अडचणीत सापडल्याची माहिती समोर आली असून या प्रकरणी केंद्र सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाकडून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याबद्दल जालना मतदारसंघाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ''जर एका खासदारालाही परराष्ट्र मंत्रालयाकडून प्रतिसाद मिळत नसेल, तर सर्वसामान्य भारतीय नागरिकांची परिस्थिती काय असेल याची कल्पना करता येते,'' असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

खासदार डॉ. काळे यांनी सांगितले की, ते २७ फेब्रुवारी रोजी मुंबईमार्गे दुबईला गेले होते. २८ फेब्रुवारी रोजी दुबई येथे पोहोचल्यानंतर ते आपल्या परिवारासह तसेच आणखी दोन परिवारांसोबत हॉटेलकडे जात असताना परिसरात अचानक युद्धजन्य तणाव निर्माण झाल्याची माहिती मिळाली. या घटनेमुळे तेथील वातावरणात मोठा तणाव निर्माण झाला आणि परतीचा प्रवास कधी होणार याबाबत अनिश्चितता निर्माण झाली.

त्या काळात इराणसंबंधित वाढत्या तणावामुळे परिस्थिती अधिकच गंभीर झाली होती. दुबईमध्ये हजारो भारतीय नागरिक अडकले होते. विमानतळ काही काळासाठी बंद करण्यात आल्याने नागरिकांमध्ये भीती आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. आपण सुरक्षितपणे भारतात परत येऊ शकू की नाही, अशी भीती अनेकांच्या मनात होती, असेही त्यांनी सांगितले.



या संदर्भात आपण तात्काळ केंद्र सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाला ई-मेल व पत्राद्वारे माहिती दिली, मात्र त्यावर कोणताही प्रतिसाद मिळाला नाही, अशी खंत डॉ. काळे यांनी व्यक्त केली. ''अशा परिस्थितीत केंद्रातील संबंधित मंत्र्यांनी पत्रकार परिषद घेऊन परदेशात अडकलेल्या भारतीय नागरिकांना धीर देणे आवश्यक होते. किती भारतीय अडकले आहेत, त्यांना परत आणण्यासाठी कोणती पावले उचलली जात आहेत, याबाबत स्पष्ट माहिती देणे गरजेचे होते,'' असेही ते म्हणाले.

दुबईतील काही ठिकाणी हॉटेल बुकिंगची मुदत संपलेल्या नागरिकांच्या निवास व खर्चाची तात्पुरती व्यवस्था तेथील प्रशासनाने केल्याची माहितीही त्यांनी दिली. विमानतळ बंद असल्यामुळे अनेक नागरिकांना काही दिवस तेथेच थांबावे लागले.

साधारण तीन ते चार दिवसांनंतर हळूहळू विमानसेवा सुरू झाल्यानंतर काही भारतीय नागरिकांना परत येणे शक्य झाले. या कठीण काळात काही ओळखीच्या व्यक्तींनी स्थानिक पातळीवर मदत करण्याचा प्रयत्न केला, असेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, आपल्या सुखरूप परतीसाठी मतदारसंघातील नागरिकांनी केलेल्या प्रार्थना,दुवा व दिलेल्या शुभेच्छांबद्दल डॉ. कल्याण काळे यांनी कृतज्ञता व्यक्त केली. पान २ वर

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडला राज्याचा अर्थसंकल्प

# अर्थसंकल्प २०४७ च्या विकसित महाराष्ट्राकडे जाणारा - मुख्यमंत्री

## शेती, ग्रामीण, सेवा, वाहतूक, आरोग्य क्षेत्रासाठी घोषणा

**मुंबई -** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राचा २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प विधानसभेत मांडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अर्थसंकल्प समर्पित करत असल्याचं जाहीर केलं. तर, अजित पवार यांचं स्मारक उभारण्याची तसेच त्यांच्या नावानं पुरस्कार देण्याची घोषणा देवेंद्र फडणवीस यांनी केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा अर्थसंकल्प २०४७ च्या विकसित महाराष्ट्राकडे जाणारा आहे, असं म्हटलं. महात्मा फुले यांच्या जन्माला २०० वर्ष पूर्ण होत आहे. यासाठी एक समिती स्थापन करुन विविध कार्यक्रम आयोजन करण्यासाठी निधी दिला जाईल.

बाबासाहेब आंबेडकर यांच्या चवदार तळे पान २ वर



### महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला गती देणारा अर्थसंकल्प - रावसाहेब दानवे

**जालना, । प्रतिनिधी -** राज्य सरकारने सादर केलेला सन २०२६-२७ चा अर्थसंकल्प हा महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला गती देणारा तसेच विकसित भारतच्या ध्येयाला बळकटी देणारा असल्याची अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी व्यक्त केली. या अर्थसंकल्पामध्ये शेतकरी, महिला, तरुण तसेच ग्रामीण आणि शहरी विकासाला प्राधान्य देण्यात आले असून राज्याच्या आर्थिक प्रगतीचा भक्कम पाया आहे, असे दानवे यांनी सांगितले.



शेतकऱ्यांसाठी'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान तसेच 'बळीराजा मोफत वीज योजना सुरू ठेवण्याचा निर्णय हा शेतकऱ्यांना दिलासा देणारा असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच मराठवाड्यासह दुष्काळग्रस्त भागासाठी कृष्णा खोऱ्यातील पुराचे पाणी वळवण्याचा प्रकल्प आणि वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पामुळे भविष्यात पाणी प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा निघण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी माझी लाडकी बहीण योजना आणि लखपती दीदी उपक्रमाला दिलेले बळ तसेच तरुणांसाठी स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्याचा निर्णय राज्यात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणारा ठरेल.

जालना जिल्ह्यासह मराठवाड्यातील जिल्ह्यांचा'आकांक्षित जिल्हे कार्यक्रमात समावेश करण्यात आल्यामुळे या भागाच्या विकासाला मोठी गती मिळेल, असेही दानवे म्हणाले.

''हा अर्थसंकल्प राज्याच्या प्रगतीचा दूरदृष्टीपूर्ण आराखडा आहे. या निर्णयांमुळे महाराष्ट्र अधिक सक्षम, समृद्ध आणि विकसित होईल,'' असा विश्वास रावसाहेब दानवे यांनी व्यक्त केली.

### शेतकऱ्यांना दिलासा देणारा अर्थसंकल्प - आमदार खोतकर

**जालना । प्रतिनिधी -** राज्य सरकारने सादर केलेला अर्थसंकल्प हा सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, कष्टकरी आणि युवकांच्या अपेक्षांना न्याय देणारा असून राज्याच्या सर्वांगीण विकासाचा रोडमॅप मांडणारा आहे. विशेषतः शेतकऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेल्या कर्जमाफीच्या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकरी बांधवांना मोठा दिलासा मिळणार आहे. या निर्णयामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना नव्याने उभारी मिळेल आणि शेती क्षेत्राला चालना मिळेल. या अर्थसंकल्पात शेती, पायाभूत सुविधा, उद्योग, रोजगारनिर्मिती, शिक्षण आणि सामाजिक विकास यांसाठी केलेल्या तरतुदी राज्याच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. ग्रामीण आणि शहरी भागाचा समतोल विकास साधण्याचा प्रयत्नही या अर्थसंकल्पातून दिसून येतो. राज्याच्या प्रगतीला गती देणारा आणि सर्व घटकांना न्याय देणारा हा सकारात्मक अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल मुख्यमंत्री आणि अर्थमंत्री यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो.



### रोजगार निर्मिती, दळणवळणास गती, शेतकऱ्यांना दिलासादायक अर्थसंकल्प - शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे

**जालना । प्रतिनिधी -** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे ,उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या महायुती सरकारने आज सादर केलेल्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना दोन लाख रुपयां पर्यंत कर्जमाफी जाहीर करून शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे . यासोबतच गोपीनाथ मुंडे अपघात विमा मध्ये बदल करून शेतकऱ्यांसह शेतमजुरांचाही या योजनेत समावेश करत दिलासा दिला. नवीन औद्योगिक, लॉजिस्टिक धोरण राबवून राज्यामध्ये ५० लाख बेरोजगार युवकांसाठी रोजगार निर्मितीची घोषणा, आग्र्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक ,पानिपत मध्ये मराठा शौर्य स्मारके उभे करण्याची घोषणा ,राज्यात ऐतिहासिक किल्ल्यांचे जतन व संवर्धनासाठी भरीव तरतूद करण्यात आलेली आहे.



रस्ते, पूल ,पायाभूत सुविधांसह मुख्यमंत्री बळीराजा शेतपानंद रस्ता योजना ,एक हजार लोकसंख्येच्या वरील गावांना सिमेंट काँक्रीट करून पक्क्या रस्त्याने जोडले जाणार आहे. महिला गोपालकांना शेळीपालनासाठी विशेष योजनांची तरतूदही करण्यात आली. शेतकरी, सर्वसामान्यांना दिलासादायक, विकासाची गती वाढवणारा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी व्यक्त केली.

### राज्याच्या विकासाला नवी गती देणारा अर्थसंकल्प - भास्कर दानवे

**जालना । प्रतिनिधी -** सादर झालेला महाराष्ट्राचा अर्थसंकल्प हा सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला व युवकांना केंद्रस्थानी ठेवून तयार करण्यात आलेला आहे. शेती, पायाभूत सुविधा, रोजगार निर्मिती आणि सामाजिक कल्याण यावर दिलेला भर राज्याच्या विकासाला नवी गती देणारा ठरेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सादर झालेला हा अर्थसंकल्प निश्चितच महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महत्त्वाचा ठरेल.'' अशी प्रतिक्रिया जालना भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांनी दिली आहे.



# संपादकीय पान

## घरच्या मैदानावर इतिहासाची संधी ...

मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर गुरुवारी झालेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेच्या दुसऱ्या उपान्त्य फेरीत भारताने इंग्लंडला ७ धावांनी हरवून अंतिम फेरीत धडक मारली आणि सलग दुसऱ्यांदा टी २० विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहचण्याची करामत केली. अर्थात भारताला हा विजय सहज मिळाला नाही हा सामना शेवटच्या चेंडूपर्यंत रंगला. अतिशय रोमहर्षक ठरलेल्या या सामन्यात इंग्लंडने भारताला जशास तसे उत्तर देऊन १४५ कोटी जनतेच्या हृदयाचे ठोके वाढवले. बुधवारी न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेला सहज हरवत अंतिम फेरी गाठली अंतिम सामन्यात त्यांच्या सोबत कोण खेळणार याचे उत्तर गुरुवारच्या सामन्यातून मिळणार होते त्यामुळे सर्वांची नजर टीव्ही कडे लागली होती. इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रुक्स याने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी घेतली. प्रथम गोलंदाजी घेऊन भारताला लवकरात लवकर बाद करण्याचा त्याचा मनसुबा होता त्याचा हा मनसुबा काही प्रमाणात यशस्वी होताना दिसला. भारताचा सलामीवीर अभिषेक शर्मा पुन्हा एकदा स्वस्तात बाद झाला पण दुसरा सलामीवीर आणि महत्वाच्या क्षणी फॉर्मात आलेल्या यष्टिरक्षक फलंदाज संजू सॅमसनने त्याच्या मनसुब्यावर पाणी फेरले. त्याने या सामन्यातही तडाखेबंद फलंदाजी करत ८९ धावा तडकावल्या. त्याला ईशान किशन, शिवम दुबे याने चांगली साथ दिली. हार्दिक पांड्या, तिलक वर्मा आणि सूर्यकुमार यादव यांनीही छोट्या पण महत्वाच्या खेळी केल्याने भारताने २० षटकात २५३ धावा काढल्या. उपान्त्य फेरीसारख्या निर्णायक सामन्यात अडीचशे धावांचा पाठलाग करणे सोपे नसते त्यामुळे भारत हा सामना सहज जिंकेल असा कयास बांधला जात होता. सर्वांनाच तसे वाटत होते मात्र इंग्लंडच्या फलंदाजांच्या मनात वेगळेच होते. त्यांचा सलामीचा फलंदाज फील सॉल्ट आणि कर्णधार हॅरी ब्रुक्स स्वस्तात बाद झाले पण युवा जेकब बेथेल ने हार मानली नाही. एकीकडे समोरचे फलंदाज बाद होत असताना त्याने एकबाजू लावून धरली ती ही तडाखेबंद फलंदाजी करत. फलंदाज जरी बाद होत असले तरी त्यांनी जवळपास बाराच्या सरासरीने धावा काढणे सुरूच ठेवले त्यामुळेच सतराव्या षटकापर्यंत सामना इंग्लंडच्या आवाक्यात होता मात्र १८ व्या षटकात बुमराने अवघ्या सहा धावा देऊन सामना भारताच्या बाजूने झुकवला. पुढच्याच षटकात हार्दिक पांड्याने त्याची पुनरावृत्ती केली आणि विजयावर शिक्कामोर्तब केले. या दरम्यान जेकब बेथेल याने आपले शतक पूर्ण केले पण त्याचे शतक व्यर्थ गेले आणि भारत अंतिम फेरीत पोहचला. भारत आता विश्व विजयापासून अवघे एक पाऊल दूर आहे. अंतिम फेरीसाठी भारतीय संघाला खूप खूप शुभेच्छा!

**श्याम बसप्पा ठाणेदार, दौंड, जिल्हा पुणे**

पान १ वरुन

### दुबईत तणाव ...

''मातृभूमीत परत आल्यानंतर एखाद्या लेकराला आईच्या कुशीत परत आल्यासारखा आनंद झाला,'' असे भावनिक शब्द त्यांनी व्यक्त केले. या संपूर्ण घटनेच्या पार्श्वभूमीवर परदेशात अडकलेल्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षेसाठी केंद्र सरकारने अधिक प्रभावी व तत्पर यंत्रणा उभारण्याची गरज असल्याची मागणी त्यांनी केली आहे. तसेच संकटाच्या काळातन परदेशातील भारतीय नागरिकांशी थेट संवाद साधण्याची व्यवस्था अधिक मजबूत करावी, असेही त्यांनी नमूद केले.यावेळी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्री राजाभाऊ देशमुख, शहराध्यक्ष अतिक खान, बदर भाई, श्री जयप्रकाश दादा चव्हाण, राम सिरसाठ, सोपानराव तिरुखे,कल्याणराव तारडे, देवजी नाना जऱ्हाड, काँग्रेस चे नगरसेवक व इतर अनेक मान्यवर उपस्थित होते

हिंदु जनजागृती समिती आणि वारकरी संप्रदायाचा मोठा विजय!

# वारकरी संप्रदायाची बदनामी करणारे 'ईठ्ठला' नाटक अखेर स्थगित

## मंत्री उदय सामंत यांची निर्मात्यांना कडक तंबी; नाव, पात्रे आणि संकल्पना बदलण्याचे आदेश

**मुंबई । रत्नागिरी -** वारकरी संप्रदाय, संत परंपरा आणि विठ्ठल भक्तीची घोर विटंबना करणाऱ्या 'ईठ्ठला' या नाटकाचे सादरीकरण राज्यभर वादंग निर्माण झाल्यानंतर अखेर स्थगित करण्यात आले आहे. राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री तथा रत्नागिरीचे पालकमंत्री ना. श्री. उदयजी सामंत यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत निर्मात्यांची कडक शब्दांत 'कानउघडणी' केली. त्यानंतर नाटकाच्या निर्मात्यांनी हे नाटक सद्यस्थितीत थांबवण्याचा आणि नाव, कथानक व पात्रांच्या नावांमध्ये बदल करण्याचा निर्णय लेखी स्वरूपात दिला आहे.

नेमके प्रकरण काय? : रत्नागिरी येथील स्वातंत्र्यवीर सावरकर नाट्यगृहात ६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत निर्माता श्री. जयप्रकाश पाखरे, वीरशैव समाज, लांजा निर्मित श्री. अमोल रेडीज लिखित आणि दिग्दर्शित अमोल रंगयात्रीतर्फे (लांजा) 'ईठ्ठला' हे नाटक सादर झाले होते. हे नाटक पाहिल्यानंतर हिंदु जनजागृती समिती आणि वारकरी संप्रदायाचे कार्यकर्ते संतापले. नाटकात वारकरी भक्तांना चक्क 'हत्यारे' म्हणून दाखवून संप्रदायाची प्रतिमा मलिन करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न झाल्याचे समोर आले.

मंत्र्यांचा हस्तक्षेप आणि कडक सूचना ! : विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक श्री. सुनील घनवट, श्री सतीश सोनार व श्री रवी नलावडे यांनी मुंबईत मंत्री उदय सामंत यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन दिले. या वेळी ना. सामंत यांनी तात्काळ नाटकाच्या निर्मात्यांना भ्रमणभाषवरून संपर्क साधला आणि संतांच्या नावाने चाललेला हा अनाचार थांबवण्याचे आदेश दिले. ''नाटकाचे नाव बदला, पात्रांना दिलेली संतांची नावे हटवा आणि वारकरी संप्रदायाला हिंसक दाखवणारी संकल्पना त्वरित बदला,'' अशा कडक सूचना मंत्र्यांनी दिल्या.

निर्मात्यांची लेखी माघार: मंत्र्यांच्या भूमिकेनंतर, नाटक निर्माते 'वीरशैव समाज, लांजा' यांनी हिंदु जनजागृती समितीला लेखी पत्र दिले आहे. यात त्यांनी म्हटले आहे की, ''वारकरी संप्रदाय आणि समितीने घेतलेल्या आक्षेपांचा आदर राखून आम्ही हे नाटक थांबवत आहोत. आक्षेपार्ह प्रसंग आणि नावांमध्ये आवश्यक बदल करूनच पुढील सादरीकरण केले जाईल.''

**नाटकातील अत्यंत संतापजनक आणि आक्षेपार्ह भाग :**

विठ्ठलाचे नाव घेणारे दाम्पत्य १० निष्पाप पाहुण्यांची हत्या करते, असे दाखवून वारकरी भक्तांना गुन्हेगार ठरवण्यात आले.

नाटकातील पात्रांना तुका, जना आणि नामा अशी संतांची नावे देऊन त्यांच्या हातून खून होताना दाखवले, जो वारकरी संतांचा मोठा अपमान आहे.

आई (जना) ही विठ्ठल नामात बेभान होऊन आपल्याच मुलाची (नामा) हत्या करते, असे अघोरी दृश्य दाखवून समाजाची दिशाभूल करण्यात आली.

''अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली आमच्या श्रद्धास्थानांची विटंबना कदापि खपवून घेतली जाणार नाही. मंत्री उदय सामंत यांनी वारकऱ्यांच्या भावना समजून घेऊन तातडीने जी कारवाई केली, त्याबद्दल आम्ही त्यांचे अभिनंदन करतो.''

# दादांच्या विमान अपघाताचे गूढ हवेत गिरट्या घालतंय..?

महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्या विमान अपघातातील मृत्यूला एक महिना होऊन गेला आहे. मात्र, आरोपांची उड्डाणे काही थांबत नाहीत.अजित पवार यांचे पुतणे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार असलेले रोहित पवार या संदर्भात अनेक आरोप करत आहेत आणि त्यांची उत्तरे सरकार देत नाही. केवळ चौकशी सुरु आहे, तपास यंत्रणा तपास करत आहेत, अशी गुळमुळीत उत्तरे दिली जात असल्याने कुठे पाणी मुरतंय का, अशी शंका आता सर्वांना येत आहे. २८ जानेवारी रोजी सकाळी पावणेनऊच्या सुमारास अजित पवार यांचे विमान बारामती विमानतळावर उतरत असताना कोसळले. तेव्हापासून यामागे घातपात असल्याची शंका उपस्थित केली जात आहे. रोहित पवारांनी याबाबत अनेकदा प्रेझेंटेशन करत अनेक मुद्दे मांडले आहेत. एवढेच नाही तर त्यांनी या संपूर्ण प्रकरणात पोलिसांत तक्रार करण्यासाठीही प्रयत्न केले होते. मात्र, पोलिसांनी त्यांची तक्रार घेण्यास नकार दिला. यावरून हे प्रकरण दिसते तितके सोपे नसल्याचे सगळ्यांच्या लक्षात आले आहे.

आता तर एक गंभीर चूक समोर आली आहे. विमान अपघात चौकशी विभाग (एएआयबी) ने एक महिन्यानंतर चौकशीचा पहिला प्राथमिक अहवाल दिला. या अहवालात अनेक चुका आढळून आल्याने त्यांच्या चौकशीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. यातील पहिली चूक म्हणजे विमान झाडाला धडकून पडल्याचा अहवाल आहे. याला रोहित पवार आणि छगन भुजबळ यांनीही आक्षेप घेतला आहे.

कोणत्या झाडाला धडकून विमान कोसळले, असा प्रतिप्रश्न रोहित पवार यांनी केला आहे. कारण झुडुपांची उंची आणि विमानाची उंची यांची तुलना करता येत नाही, असे सांगत त्यांनी एएआयबीचा हा मुद्दा खोडून काढला आहे. या अहवालात आणखी एक चूक आढळल्याचे रोहित पवार यांनी निदर्शनास आणून दिले आहे. यात बारामतीचा उल्लेख जिल्हा आणि बारामती महापालिका असल्याचे नमूद केले आहे. यावरून एएआयबी तपासाच्या बाबतीत खरोखरच गंभीर आहे का, असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो. रोहित पवार यांच्या आरोपानंतर एक महिन्याने डीजीसीएने व्हीएसआर व्हेंचर्स कंपनीच्या विमानांच्या उड्डानावर बंदी घातली. म्हणजेच त्यांना नक्कीच काही त्रुटी आढळल्या आहेत. ज्याप्रमाणे रोहित पवार आरोप करत आहेत तो घाव कुणाच्या तरी नक्कीच वर्मी लागत असेल अन्यथा हे आरोप खोटे आहेत, असे एएआयबी किंवा डीजीसीएने स्पष्ट केले असते. या आरोपांवर कळस म्हणजे



रोहित पवार यांनी आणखी एक गंभीर आरोप केला आहे. याच व्हीएसआर कंपनीच्या विमानाने तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे दावोसला जात असताना नियमांचे उल्लंघन केले म्हणून विमान पाडण्याचा इशारा इराण आणि इराकने दिला होता. परवानगी न घेता विमान दुसऱ्या देशाच्या हद्दीत घुसत असेल तर त्या देशांचा तो अधिकार आहे. मात्र, अशी परवानगी न घेणे, ही संबंधित कंपनीची घोडचूक आहे. मुख्यमंत्री आणि राज्याचे अधिकारी या विमानात होते. व्हीएसआर कंपनीचा कारभार किती बेमुर्वतपणे सुरू आहे, याचा हा उत्तम नमुना आहे.ही घटना जानेवारी २०२३ मधील आहे. रोहित पवार यांच्या या आरोपाने राज्यातच नव्हे तर देशात खळबळ उडाली आहे. तत्पूर्वी तीन दिवसांपूर्वी जय अजित पवार यांनी ट्वीट करत खळबळ उडवून दिली होती. याच व्हीएसआर व्हेंचर्स कंपनीच्या विमानात कंपनीचा मालक कॉकपिटमधील पायलटच्या खुर्चीत खुशाल झोपलेला होता. ही केवढी गंभीर बाब आहे. मुळात पायलटच्या खुर्चीत बसून कुणी आरामात कसा झोपू शकतो ? एवढे असूनही या कंपनीच्या सर्व विमानांवर डीजीसीएने अजून संपूर्ण कारवाई केलेली नाही. डीजीसीएने केवळ व्हीएसआर कंपनीची काही विमाने जमिनीवर उतरवली आहेत. या कंपनीवर एवढे आरोपही होऊनही त्यांच्यावर अजून म्हणावी तशी कठोर कारवाई झालेली नाही. त्यामुळे व्हीएसआर कंपनीची कोण पाठराखण करत आहे, असा सवाल रोहित पवार करत आहेत. रोहित पवार यांनी याआधी तीन पत्रकार परिषदा घेऊन वेगवेगळे आरोप केले होते. आता चौथ्या पत्रकार परिषदेत त्यांनी अपघातापूर्वी विमानतळाची रेकी झाली होती, असा आरोप करत याचा गुन्हेगारी पद्धतीने तपास केला पाहिजे, अशी मागणी केली. एक बाब लक्षात घेतली पाहिजे की, अजित पवार यांच्या विमान अपघातासंदर्भात रोहित पवार वारंवार प्रश्न उपस्थित करत आहेत. त्यातून अनेक शंकांना वाव मिळत आहे. शिवाय त्यांनी या संपूर्ण प्रकरणाची सीबीआय चौकशीची मागणी केली आहे. त्याला अजून सरकारने होकार दिलेला नाही. एकूणच अजित पवार यांच्या विमान अपघाताचे गूढ दिवसेंदिवस वाढत आहे आणि सोबत व्हीएसआर कंपनीच्या विश्वासार्हतेबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळेच या सर्व शंकांना कधी पूर्णविराम मिळेल आणि अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूवरील सावट कधी हटणार, हे महत्त्वाचे प्रश्न अनुत्तार अनुत्तरित आहेत. या प्रकरणाला जी विविध वळणे मिळत आहेत ते पाहता ही चौकशी आहे की चौकशीचा फार्स, असे अनेकांच्या मनात आल्याशिवाय राहत नाही. दादांच्या विमान अपघाताचे गूढ हवेत गिरट्या घालतंय..

**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी,**
**कागल-कोल्हापूर**

पान १ वरुन

### अर्थसंकल्प २०४७ च्या ...

येथील सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षा निमित्त रायगड येथे पायाभूत सुविधा केल्या जातील. हे वर्ष सामाजिक समरसता वर्ष म्हणुन साजरा केला जाईल.

बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या स्मारकाच्या पहिल्या टप्प्याचं काम पूर्ण झालं आहे, येत्या काही दिवसात काही योजना सुरु केल्या जातील, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्प सादर करताना दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं स्मरण केलं. ते म्हणाले माझं अंतःकरण जड झालं आहे.

अजित दादा यांनी ११ वेळा अर्थसंकल्प मांडला. त्यांच्यामुळे आर्थिक शिस्त राहिली. त्यांना श्रद्धांजली म्हणुन त्यांच भव्य स्मारक उभारल जाईल.नागरी पुरस्कार त्यांच्या नावाने सुरु केला जाईल. हा अर्थसंकल्प अजित पवार यांना समर्पित करतो, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

महाराष्ट्र देशात अर्थिक अंजिन असल्याने आपला वाटा मोठा असेल. राज्याची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर होणारआहे. विकसित महाराष्ट्राचं प्रतिबिंब या अर्थसंकल्पात पाहायाला मिळणार आहे. राज्याचे व्हिजन डॉक्युमेंट तयार केले आहे.

प्रादेशिक संतुलित विकासासाठी चार प्रमुख स्तंभ ठरवले आहेत, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.चार स्तंभाखाली १६ उपक्षेत्रं ठरवले आहेत. प्रत्येक अर्थसंकल्पात त्याची छबी दिसेल, असंही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

**अर्थसंकल्पातून काय स्वस्त झालं?**

मधुमेहावरील उपचार, कर्करोगवरील औषधं, क्रीडा साहित्य, वैद्यकीय उपकरणे, सौर पॅनल

**अर्थसंकल्पातून काय महाग झालं?**

दारु, सिगारेट, तंबाखूजन्य पदार्थ.

**शेती आणि ग्रामीण क्षेत्रासाठी घोषणा**

देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री ग्रामीण पशूधन उद्योजक योजना,महाराष्ट्र नैसर्गिक शेती अभियान,मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना,मुख्यमंत्री बळीराजा शेतपाणंद रस्ते योजना या नव्या योजनांची घोषणा केली आहे. गोपीनाथ मुंडे अपघात योजनेत शेतमजूर यांचा हा सहभाग करण्यात येणार आहे.

राज्याचे नवे गुंतवणूक धोरण जाहीर करण्यात आले आहे. प्रत्येक जिल्ह्यात सुक्ष्म व लघू केंद्र स्थापन केले जातील, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

**सेवा क्षेत्र**

मुंबई व पुण्याला ५० अब्ज डॉलरचे केंद्र तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. जगात गेमिंग क्षेत्रात अव्वल होण्यासाठी महाराष्ट्रात २९५पेक्षा जास्त गेमिंग स्टुडिओ तयार करण्यासाठी प्रयत्न केले जातील.महाराष्ट्रातील पुणे हे जीसीसी साठी सर्वात पसंतीचे शहर ठरत आहे.४ लाख उच्च कुशल रोजगार निर्मितीचे लक्ष आहे

**शाश्वत शहरी विकास**

२०४७ पर्यंत राज्याची नागरी लोकसंख्या ७० टक्के होईल. राज्याच्या स्थूल राज्य उत्पन्नात या घटकाचे ७० ते ८० टक्के योगदान असेल. १० प्रादेशिक विकास प्राधिकरणे स्थापन करणे. शहरी सेवा डिजीटल करणार आहोत.बुलेट ट्रेनच्या तीन स्थानकांचं काम २०२७ पर्यंत पूर्ण हेईल.तिसरी मुंबई म्हणुन उरण या परिसरात विकासकामं होतील.मुंबईत बेकायदेशीर बांधकाम होऊ नये यासाठी प्रयत्न केले जातील. चौथी मुंबई वाढवण येथे होईल. एमएमआरमध्ये १० लाख नवी घरे उभारणार

नवी अनधिकृत बांधकामे होणार नाहीच याचा रोडमॅप तयार होणार आहे, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं. पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर विभागाचा ग्रोथ हब म्हणून विकास आराखडा तयार करण्यात येईल. नागपूर रिंगरोडला मंजुरी देण्यात आली आहे.

**वाहतूक**

राज्यात १२०० किलो मीटरचे मेट्रो मार्ग,६००० किमी पेक्षा जास्त लांबीचे द्रूतगती मार्ग विकसित करण्याचं नियोजन आहे. मुंबई, पुणे, नागपूरमध्ये मेट्रो मार्गिकांची कामं प्रगतीपथावर आहेत. २०२९ पर्यंत १६५ किमी लांबीच्या मेट्रो मार्गिका खुल्या करण्यात येणार आहेत.

वडाळा ते गेट वे ऑफ इंडिया मुंबई मेट्रो मार्गिका ११ हा २३४८७ कोटी रुपये किंमतीचा पूर्णपणे भूमिगत प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाचा विस्तार धारावी पुनर्वसन प्रकल्पासून वांद्रे टर्मिनर्सपर्यंत करण्याचे नियोजन. मुंबई विमानतळ आणि नवी मुंबई विमानतळ यांना जोडणारा मुंबई मेट्रो मार्ग क्रमांक ८ हा २२८६२ कोटी रुपयांचा प्रकल्प हाती घेण्यात येणार आहे. तळोजा ते खांदेश्वर मेट्रो मार्ग २ मुळे नवी मुंबई विमानतळापर्यंत वाहतूक व्यवस्था सुधारले. वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी भुयारी मार्गांचे जाळे विणण्याची योजना. मुंबईतील पूर्व आणि पश्चिम परिसराला जोडणाऱ्या गोरेगाव-मुलुंड प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

दक्षिण मुंबईला समृद्धी महामार्गासोबत जोडण्यासाठी २०२८ पर्यंत काम करण्याचे प्रयत्न आहोत. वर्सोवा भाईंदर किनारी मार्ग डिसेंबर २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. पनवेल ते कर्जत अंतिम टप्प्यात तो मार्ग लवकरच वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल.१ हजारांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांना काँक्रिट रस्त्याने जोडण्यात येईल. राज्यातील विविध विमानतळांचं विस्तारीकरण केलं जाईल. वाढवण बंदरासाठी राज्य सरकारकडून टप्प्याटप्प्यानं निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

मच्छीमारांच्या अडचणी आणि गरजा लक्षात घेता पालघर जिल्ह्यातील सातपाटी येथे आधुनिक बंदर विकसित करण्यात येईल. वाढवण बंदर प्रकल्पातून १२ लाख रोजगार उपलब्ध होणार आहेत. वाढवणच्या जवळील ४४ गावांतील तरुणांना रोजगार देण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम राबवला जातोय.

**ऊर्जा शाश्वतता**

२०४७ पर्यंत ७५ टक्के स्वच्छ ऊर्जा मिळवण्याचे राज्याचे धोरण, यासाठी सौर ऊर्जा, पवन आणि हरीत हायड्रो ऊर्जा प्रकल्पांना चालना दिली जात आहे. मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना २०२६-२७ मध्येही सुरु राहणार आहे. २० हजार कोटी रुपयांचा निधी आरक्षित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेद्वारे शेतकऱ्यांना कृषीपंपासाठी दिवसा वीज पुरवठा करण्यात येईल. मागेल त्याला सौर कृषी पंप बसवण्यात राज्य अग्रेसर असल्यानं गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे.

**शेतकरी कर्जमाफी**

कर्जमाफी योजना राबवण्याचं आश्वासन दिलं होतं. ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीक कर्ज थकित असलेल्या शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर करत आहे, असं देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलं आहे. नियमित कर्जपरतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्यात येईल, असं देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलं.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अशीच सुरु राहणार आहे. या योजनेकरता आवश्यक ती भरीव तरतूद करण्यात आली आह, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं. राज्यात ३७ लाख लखपती दीदी झाल्या आहेत.आणखी २५ लाख बहिणींनी लखपती दीदी करण्याचे उद्दिष्ट आहे .

राज्यात महिमा संस्थेची स्थापना केली जाणार आहे.तरुणांना बाहेरगावी जाण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन केले जाईल.३६ नवदिशा केंद्र स्थापना केली जाईल.महाराष्ट्र हे देशाचे स्टार्ट अप कॅपिटल ठरले आहे.युनिकॉर्न मध्ये ही महाराष्ट्र अव्वल आहे. महाराष्ट्रात १ लाख २५ हाजर उद्योजक घडविणे व ५० हजार स्टार्ट अप तयार करण्याचे उद्दिष्ट आहे.

**आरोग्य**

दरे परिसरात निसर्गोपचार केंद्र सुरु केले जाईल.मधुमेहाचे लवकर निदान करण्यासाठी ४ हजार ५०० कोटी रुपयांची योजना प्रस्तावित आहे.महाराष्ट्र डिजिटल तंत्रज्ञान अभियान राबविले जाईल. आयुष्यमान योजने १ हजार ३५६ वरून २ हजार ३९९ पर्यंत आजारात वाढ केली आहे, अशी घोषणा देवेंद्र फडणवीस यानी केली.

**७५ हजार पदांची भरती**

सातारा येथे शाहू महाराज आणि महाराणी ताराराणी यांच्या यांच्या स्मारकांचं जतन करण्यात येईल.

राज्यातून जास्तीत जास्त खेळाडूनी सहभाग नोंदवावा यासाठी ८ हाय परफॉरमेंस केंद्र सुरू आहेत. राज्यात चार प्रशिक्षण केंद्र सुरू करणार आहोत.

२०४७ कडे वाटचाल करण्यासाठी पारदर्शक सुशासन आवश्यक वाटते. राज्यात आतापर्यंत १ लाख २० हजार पदांची भरती केली आहे.७५ हजार पदांची पदभरती करणार आहोत.

राज्य सरकार एआयसाठी स्वतंत्र विभाग स्थापन करणार आहे. राज्यात जागतिक दर्जाचे केंद्र म्हणून विकसित करणार आहोत.स्वयंचलित वाहनांसाठी नवीन धोरण आणणार आहोत. प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक आणि सुशासन या तत्तांवर अर्थसंकल्प सादर केला.

# घराला घरपण देणारी....‘‘महिला‘‘

महिलांनी स्वतःच्या हक्कांसाठी जो लढा दिला त्याच्या स्मरणार्थ ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिवस म्हणून साजरा केला जातो. तर संपूर्ण अमेरिका, आणि युरोप सहित जवळपास जगभरातल्या स्त्रियांना विसाव्या शतकाच्या सुरुवाती पर्यंत मतदानाचा हक्क नाकारला होता. त्याविरोधात महिलांनी लढा उभारला होता,त्याच वेळी जर्मनीतल्या कम्युनिस्ट कार्यकर्ती क्लारा झेटकिन प्रभावित झाली.असा एखादा दिवस असावा, ज्या दिवशी जगभरातल्या महिला आपल्या मागण्यासाठी लढ्याचा निर्धार व्यक्त करू शकतील.अशी कल्पना मांडली.१९१० मध्ये कोपनहेगनला झालेल्या परिषदेत ८मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून ठराव पास झाला.

पण भारतात मुंबई येथे ८मार्च १९४३ रोजी पहिला महिला दिन साजरा झाला.

दरवर्षी येणाऱ्या सणा प्रमाणे जागतिक महिला दिवस मोठ्या उत्साहानं साजरा केला जात असतो.वर्षभरात ज्या महिलांनी, शिक्षण,कला,क्रिडा,साहित्य,राजकीय क्षेत्रात विशेष कार्य केल असतं,तसेच काही महिलांनी एखादे विशेष प्रावीण्य दाखविले असते,अशा महिलांचा सत्कार,केला जातो.सन्मान केला जातो. अनेक संस्था, कार्यालयात, महिला दिन साजरा केला जातो.अशा रितीने महिलांचा सन्मान करणे उचितच आहे.तो करायलाच हवा. महिला दिन का साजरा केला जातो ?ह्याची सुरूवात कधी झाली ?,ह्या बाबतीत मात्र बहुसंख्य महिला अनभिज्ञ आहेत.आठ मार्च महिला दिन आहे, तो साजरा करणे फक्त एवढेच केले जाते.

महिला दिन असा निरनिराळ्या ठिकाणी साजरा होत असतानाच मनात अनेक प्रश्न उपस्थित होतात.ते अगदी सहज आहे.

अनेक महिलांनी निरनिराळ्या क्षेत्रात जसे शिक्षण, साहित्य, कला,राजकीय, सामाजिक, क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे.सत्तेची पद भुषविली आहेत. त्यांना संधी दिली तर त्या काय करु शकतात हे दाखवून दिले आहे.आपले वेगळेपण सिध्द केले आहे.

स्व.ईंदिरा गांधी, स्व.सुषमा स्वराज,श्रीमती प्रतिभाताई पाटील, सुमित्राताई महाजन, द्रौपदी मुर्म, आदी महिलांनी आपले वेगळेपण सिध्द केल आहे.उच्च पदावर त्या पोहचल्यात.

तर मेधा पाटकर,यांनी समाजिक कार्यात स्वःतला झोकून दिले आहे.किरण बेदींची प्रशासकीय कारकीर्द पोलिस प्रशासनात,तिहार जेलमध्ये केलेल्या बदलाने उल्लेखनीय ठरली होती.मीरा बोरवणकर,सुधा मूर्ती आहेत.

आजही राजकीय क्षेत्र बघितले तर,डॉं निलम गोरे,खा.सुप्रिया सुळे,आ. पंकजा मुंढे,खा.प्रणिती शिंदे,,आ.भावना गवळी,खा.रक्षा खडसे,आ.श्रध्दा महाले, खा.डॉ. मेधा कुळकर्णी,या महिलांनी राजकीय क्षेत्रात आपलं स्थान निर्माण केलय.अनेक लेखिका आहेत,शिक्षण क्षेत्रातील महिला आहेत, कला.क्षेत्र, त्यांनी वेगळं स्थान निर्माण केलयं.

आजही अनेक महिला प्रशासकीय सेवेत उच्च पदावर कार्य करीत आहेत.मुख्य सचिव, आयुक्त,जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक,,तहसीलदार, गट विकास अधिकारी, नगर पालिका मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी,बँक अधिकारी अनेक क्षेत्र आहेत.कुठलं क्षेत्र बाकी नाही. आय.टी. क्षेत्रात तर खूप मुली दाखल होत आहे.

जुना इतिहास बघितला तर जिजाबाई, , राणी लक्ष्मीबाई, आनंदीबाई जोशी, सावित्रीबाई फुले,अशी अनेक उदाहरणे देता येतील.महिलांनी एक वेगळा क्रांतीकारी ईतिहास घडवलाय.आनंदीबाई, सावित्रीबाईंनी स्त्रीशिक्षणाचा,स्त्रीमुक्तिचा पाया रचला.पुण्यात महिलांसाठी पहिली शाळा काढली.एकूण अठरा शाळा काढल्यात.

पहिली महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले, पहिली महिला आयपीएस महाराष्ट्र मीरा बोरवणकर ,पहिली महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी, पहिली महिला मंत्री शालिनीताई पाटील, पहिली महिला न्यायाधीश उच्च न्यायालय सुजाता मनोहर, त्यानंतर मृदुला भाटकर, पहिली महिला महापौर निर्मिती सावंत प्रभावळकर, पहिली महिला राज्यपाल विजयालक्ष्मी पंडित, पहिली महिला एव्हरेस्ट सर करणारी कृष्णा पाटील, पहिली महिला पोलीस महासंचालक रश्मी शुक्ल, पहिली महिला साहित्य संमेलन अध्यक्ष कुसुमावती देशपांडे,नंतर दुर्गा भागवत, अरुणा ढेरे,राष्ट्रपतीपदी प्रतिभाताई पाटील. अशी प्रतिभावान महिलांची उदाहरणे आहेत.

‘‘आई सारखे दैवत साऱ्या जगा मध्ये नाही‘‘

किंवा

‘‘जिच्या हाती पाळण्याची दोरी,ती जगासी उध्दारी‘‘असे

आपण नेहमीच म्हणतो.पण-

आता दुसऱ्या बाजूचा विचार बघीतला तर सध्या

त्या जगाचा उध्दार करणाऱ्या,दैवत असणाऱ्या, ज्या स्त्री शक्तिची नवरात्रात पूजा केली जाते.

त्या स्त्रियांची परिस्थिती कशी आहे. तीनशे पासष्ट दिवसांत एक दिवस महिला दिवस साजरा करुन त्यांचा मानसन्मान केला जातो.बाकीच्या तीनशे चौसष्ट दिवसांचे काय? हा महत्वाचा प्रश्न आहे.स्त्रिया किती सुरक्षित आहेत.रोजच वर्तमानपत्र उघडतो तर त्यात महिलांचे शोषण,विनयभंग, बलात्कार, खून अश्या बातम्या असतातच.अगदी पाच-सात वर्षाचे मुलींन पासून तर साठ-पासष्ट वर्षांचे महिलांचा त्यात समावेश असतो.ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे.दोन दिवसापूर्वी नाशिक जिल्ह्यात इव्हेंट मँनेजमेंटचे नावाखाली दोन लाख रुपयांना महिलेची विक्री केल्याची घटना वाचायला मिळाली.

समाजात, शाळेत,नोकरीच्या ठिकाणी,नातेवाईकात,प्रवासात, एकटी स्त्री किती सुरक्षित आहे? मागील काळात अनेक ठिकाणी घडलेल्या बलात्काराच्या पाशवी घटनात एका स्त्री वर दहा पुरुष बलात्कार करतात. अल्पवयीन मुलींवर होणारे अत्याचार

अशा अनेक ठीकाणी दररोज घडणाऱ्या स्त्रीअत्याचाराच्या घटना हे काय दर्शवितात? अनेक कार्यालयात महिला कर्मचाऱ्यांचा विनयभंग सारख्या घटना घडतात त्यांच शोषण होत,त्या घटना दाबून टाकल्या जातात.

अनेक वेळा बायकांसारख्या बांगड्या भरल्या का? शब्दप्रयोग करून हिणवले जाते.हा सुध्दा स्त्रियांचा अपमानच आहे.बांगड्या भरा..बांगड्या भरा.. असा शब्द प्रयोगा मागे स्त्रियांना कमी लेखण्याचा उद्देश आहे.

एका दूरचित्रवाणी वरील चर्चेत एका माजी




मंत्र्यांनी शब्दप्रयोग केला होता,त्यावेळी स्व.विद्या बाळ यांनी त्यांना खूपच कडक शब्दात फटकारले होते.पण असा सडेतोडपणा सगळ्याच महिलांजवळ नसतो,ज्याची आज गरज आहे.अजून एका माजी मंत्र्यांनी भरसभेत ‘‘आपल्या तहसीलदार मँडम ‘‘हिरोईन‘‘ आहेत,असा सभेत उल्लेख केला, राजकीय क्षेत्रात तर महिला विषयी अर्वाच्य बोलणे वाढत आहे.

स्त्रीचा अपमान तर होतोच पण शाब्दिक शोषणाचा प्रकार असे त्याला म्हणता येईल.त्यांनी ज्या भावनेने तो शब्दप्रयोग केला जातो तो तो चुकीचा असतो..

स्त्रियांना अनेक भुमिकेतून जावे लागते.माता..भगिनी..पत्नी ..मुलगी.त्या त्या वेळची जीवनातील भुमिका खऱ्या असतात.त्यात निष्ठा असते.तीच तर बांगड्या घालत असते..माता-भगिनी-पत्नी.तिची असे शब्दप्रयोगानी हेटाळणी करु नका.खऱ्या अर्थाने ती हिराँईन असते. राजकीय क्षेत्रात ज्या महिला आहेत त्याच्यावरही खालच्या पातळीवर टिका होते. सोशल मिडियावर कोणी काय लिहावे यावर काही बंधनच नाही.

राज्यात महिला आयोग आहे.त्यांनी अशा घटनांची नोंद घेउन संबधितांवर कारवाई करणे अपेक्षित असते. पण त्यांच्यावरच घाणेरड्या शब्दात लिहिले जाते. त्या काही करु शकत नाही. तर ईतरांची काय कथा.

बलात्कार, स्त्रीअत्याचाराचे घटनामध्ये कारवाईस विलंब होतो.काही वर्षे निघून जातात.त्या घटनेच गांभीर्य रहात नाही. हे आपण बघतोय.आंध्रप्रदेश सरकारने कँबिनेट मध्ये ‘‘दिशा‘‘कायदा मंजुरी दिली,सात दिवसांत तपास, चौदा दिवसांत न्यायालयीन कामकाज, आणि एकवीसाचे आत आरोपीस मृत्यूदंड. असा कायदा लागू होण्याची खूप चर्चा झाली.

महाराष्ट्रात आता स्त्रियांच्या संरक्षणासाठी ‘‘शक्ती‘‘ विधेयक दोन्ही सभागृहात मंजूर होऊन त्यावर राज्यपालांची सही झाली . व ते पुढे राष्ट्रपतींच्या सहीसाठी वरती पाठवले गेले . ते दुरुस्तीसाठी परत आले. कायदा पास होईल पण असलेल्या कायद्याची अंमलबजावणी होणे हे महत्त्वाचे आहे. असंख्य कायदे अस्तित्वात आहेत, परंतु त्याची काय परिस्थिती आहे हे आपण बघतोच.

कामाच्या ठिकाणी वावरताना महिलांना सुरक्षित आणि पोषक वातावरण मिळणं हा त्यांचा हक्क आहे. हाच हक्क जपण्यासाठी महिला आयोगाचे अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी पॉश ऑडिटचे निर्देश दिले आहेत. महिनाभरात राज्यातील सर्व सरकारी आणि खाजगी कार्यालयांचे परीक्षण पोस्ट ऑडिट होणार असून त्रुटी आढळल्यास कडक पावले उचलली जातील, असं सांगण्यात आलं आहे. महिला दिन जवळ आल्यानंतर अशा अनेक प्रकारच्या गोष्टी जाहीर होतात परंतु त्यातील किती पूर्ण जातात हा ही एक व चिंतन आणि विचार करण्यासाठी गोष्ट आहे.

दुसरा मोठा प्रश्न आहे स्त्रियांचे बाबतीत तो दुय्यम स्थानाचा.आणि राजकीय क्षेत्रात स्त्रियांचा करुन घेतला जाणारा वापर. तसेच जाहिरात क्षेत्रात स्त्री देहाचा केला जाणारा वापर.

आता तो कसा केला जातो हे काय सांगायला हवे.??

आपला उत्पादनाचा खप वाढवण्यासाठी, दूरचित्रवाणीवरील मालिकांमध्ये, जाहिरातीमध्ये, अंडरवियर, बनियान, अत्तर स्प्रे, कुठल्याही चित्रपट, नाटकांचे जाहिरातीसाठी स्त्री देहाचा नको तितका वापर,स्त्री देहाच्या नको त्या भागाच प्रदर्शन केलं जात.अर्थातच यात स्त्रियांचा दोषही आहेच.नाही म्हणून चालणार नाही. त्या स्वतःच अधःपतन करुन घेत आहेत. चित्रपटात स्नानाचे आणि बेडसीन दिले जातात.. अतिशय भडक आणि सेक्सी दृश्य असतात.. अशे दृश्य व जाहिराती त्यांनी करायला नकोत. त्यात अमुलाग्र बदल आवश्यक आहे.स्त्री संघटनांनी,आयोगाने ह्याचेवर गंभीरपणे विचार करावा.

राजकीय क्षेत्रात,जसे विधान सभा,विधान परिषदेत स्त्रियांना नगण्य स्थान आहे. त्यातही मंत्रिपदासाठी वर्णी लागली तरी,कँबिनेट दर्जा फारच कमी महिलांना मिळतो.अशी परिस्थिती आहे.जिल्हा आणि तालुका पातळीवर ग्रामपंचायत, नगरपालिका, पंचायत समिती,जिल्हापरिषद, ह्या ठिकाणी स्त्री राखीव जागा असतात.त्यात काय परिस्थिती आहे हे आपण सगळेच जाणतो. सत्ताकेंन्द्र घरातच रहावे म्हणून तिकिटांचे वाटपासाठी व्यवस्था असते.त्यातील बहुतांश महिलांना ना समाजकार्याची आवड असते ना राजकारणाची.केवळ सत्ते साठी महिलांचा वापर करुन घेतला जातो काही महिलांना प्रासंगिक चार शब्द बोलता येत नाही.आपले हक्क जबाबदाऱ्या कर्तव्ये काय माहित नसते. काही महिलांना तर सही सुध्दा करता येत नाही.त्यांचे पतीच कामकाज बघतात ही परिस्थिती नाकारता येणार नाही. खरंच ज्या महिलांना समाजकार्य, राजकारणाची आवड असते त्यांना मात्र संधी मिळत नाही , महिला सक्षम पणे उभ्या रहात नाही त्याच्यात निर्णयक्षमता येत नाही तो पर्यंत स्त्रीमुक्त आहे हे खऱ्या अर्थाने म्हणता येणार नाही. आता तर खूप ठिकाणी महिला नगरसेविका, नगराध्यक्ष, महापौर पदावर निवडून आलेल्या आहेत. खूप मोठी संधी चालून आली आहे.

आंतरराष्ट्रीय दिनाची थीम पहिल्यांदा १९९६ मध्ये सादर करण्यात आली. दरवर्षी हा दिवस साजरा करण्यासाठी एक थीम निश्चित केली जाते. यंदाची थीम ही अशी आहे. याचा अर्थ असा की जेव्हा तुम्ही एखाद्याला काही देता तेव्हा तुम्हालाही त्याचा फायदा होतो. या थीमचा उद्देश लोकांना उदार हस्ते दान करण्यास प्रोत्साहित करणे आणि लिंग समानतेला प्रोत्साहन देणे आहे.

महिलांच्या हक्कांबद्दल आणि प्रतिष्ठेबद्दल जागरूकता पसरवणे, शिक्षण, नोकऱ्या आणि नेतृत्वात लिंग समानतेला प्रोत्साहन देणे,

घरगुती हिंसाचार, छळ, असमान वेतन आणि भेदभाव यासारख्या समस्यांवर प्रकाश टाकणे

महिलांच्या सुरक्षितता, आरोग्य आणि विकासाला पाठिंबा देण्यासाठी सरकार, संस्था आणि कुटुंबांना प्रोत्साहित करणे.

स्त्री विषयक अनेक कायदे आहेत,महिलांना मिळणाऱ्या सवलतीआहेत,त्यांचीअधिकाधिक माहिती महिला पर्यंत पोहोचाव्यात, शक्ती कायदा लागू होऊन,अंमलबजावणी व्हावी,आणि महत्वाचे, मुळातच स्त्रियांकडे बघण्याचा पुरुषांचा दृष्टिकोन बदलावा. महिलांनीही आपल्या देहाचं जाहिरातीसाठी होणार प्रदर्शन थांबवावं.

ज्या महिलांमध्ये काही कतृत्व आहे त्यांना संधी प्राप्त करुन द्यावी.तरच महिला दिवस साजरा करण्याचे सार्थक होईल.

आजचा दिवस जितका महिलांसाठी खास,महत्त्वाचा आहे, तितकाच तो सगळ्यांसाठीही महत्त्वाचा आहे. कारण असे आहे, स्त्री एक मार्गदर्शक आहे. समर्थक आहे. प्रेरणादायी व्यक्ती आहे. प्रेरणेचे स्त्रोत आहे. ती आपल्या आयुष्यात कधी आई म्हणून, कधी बहीण म्हणून, कधी मैत्रीण म्हणून, तर कधी जीवनसाथी म्हणून असते. तिच्या प्रत्येक भूमिकेचा आपण आदरच करायला हवा. आपल्या आयुष्यात असणाऱ्या प्रत्येक स्त्रीचे आभार मानले पाहिजेत, कारण तिच्या विना जीवन अपूर्ण आहे.

ती आधी कुटुंब सांभाळत होती आता नोकरी करून कुटुंब सांभाळते..

पुरुष मात्र नोकरीच करत आलाय.. कुटुंबासाठी अर्थार्जन करणे, कुटुंब सांभाळायला त्याला तेव्हाही स्त्रीच हवी होती आणि आजही स्त्रीच हवी आहे..

तो अवलंबून आहे त्या स्त्रीवर..

जागतिक महिला दिना निमित्ताने सर्व मातांना, भगिनींना,पत्नीला, मैत्रिणींना आणि आपल्या आयुष्यातील प्रत्येक स्त्रीला या विशेष दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा! जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा.।



-दिलीप देशपांडे.
जामनेर. जि.जळगांव.
मोबा.८९९९५६६९१७

## जानकी महोत्सव -२०२६ व मिनी सरस विक्री प्रदर्शनाचे आयोजन;

### नागरिकांना लाभ घेण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत ग्रामीण स्वयं सहाय्यता समूहांमार्फत तयार करण्यात आलेल्या विविध उत्पादनांच्या विक्रीस प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हास्तरीय ‘‘जानकी महोत्सव २०२६’’ व मिनी सरस विक्री प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. हे प्रदर्शन दि. ७ ते ११ मार्च २०२६ या कालावधीत डॉ. फ्रेजर बॉईज हायस्कूल, आझाद मैदान समोर, जालना येथे भरविण्यात येणार आहे. तरी नागरिकांनी परिवारासह भेट देवून ग्रामीण भागातील स्वयंसहाय्यता गटातील महिलांची उत्पादीत उत्पादने व खाद्य संस्कृतीला प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या प्रदर्शनामध्ये जालना जिल्ह्यातील ग्रामीण भागातील स्वयं सहाय्यता समूहातील महिलांनी तयार केलेल्या विविध प्रकारच्या गुणवत्तापूर्ण व घरगुती उत्पादनांचे एकूण ८० स्टॉल्स उभारण्यात येणार असून, नागरिकांना ग्रामीण भागातील दर्जेदार उत्पादने खरेदी करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या स्टॉल्समध्ये गावठी पद्धतीने तयार केलेले मसाले, हळद, मिरची पावडर, पापड, खारोडी, धपाटे पीठ, ढोकळा पीठ, विविध डाळी, बाटी पीठ, विविध फरसाण, गावठी तूप, ॲपल जॅम, मध, गोड पदार्थ, घोंगडी, योगा मॅट, पत्रावळी, लाकडी खेळणी आदी विविध उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध राहणार आहेत. याशिवाय ग्रामीण भागातील अस्सल चविष्ट शाकाहारी व मांसाहारी जेवण, तसेच दहीधपाटे, झुणका-भाकर, भरीत-भाकरी, मिसळ, वडापाव अशा विविध खाद्यपदार्थांची चवही नागरिकांना चाखता येणार आहे. ग्रामीण महिला बचत गटांनी तयार केलेल्या या उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी जालना जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खरेदी करावी व महिलांच्या उद्यमशीलतेला पाठबळ द्यावे, असे आवाहन प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.



# महिला दिनानिमित्त ‘साडी वॉकेथॉन’

## ७०० महिलांची नोंदणी, ८ मार्चला सकाळी आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ जालना रेनबो यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘साडी वॉकेथॉन’ या अनोख्या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत सुमारे ७०० महिलांनी नोंदणी केली असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. हा उपक्रम रविवार, दि. ८ मार्च रोजी सकाळी ६ ते ८ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे.

शहरातील एका हॉटेलमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा श्रीपत, प्रकल्प प्रमुख डॉ. निर्मला साबू, डॉ. अनुराधा राख, डॉ. तरुणा छाबडा, नेहा पाटनी, सीए स्वाती धनावत यांनी या उपक्रमाबाबत सविस्तर माहिती दिली. महिलांनी साडी परिधान करून आरोग्यासाठी चालण्याचा संदेश द्यावा तसेच पारंपरिक वेशभूषेबाबत तरुण पिढीची सकारात्मक मानसिकता निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

या वॉकेथॉनमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थिनींपासून ते ६५ ते ७० वर्षांपर्यंतच्या महिलांचा सहभाग नोंदवला जात असून काही महिला वैयक्तिकरित्या तर काही महिला गटाच्या स्वरूपात सहभागी होत आहेत. सध्या जवळपास १५ गटांनी नोंदणी केली असून आयोजकांनी ११०० महिलांची नोंदणी करण्याचे लक्ष्य ठेवले असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

महिलांच्या आरोग्याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमादरम्यान महिलांना प्रशिक्षित डॉक्टरांकडून सीपीआर () / जीवन-संजीवनी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तसेच महिला सक्षमीकरणाच्या निमित्ताने घोषवाक्य स्पर्धेचेही आयोजन करण्यात येणार असल्याचे




अयोजकानी सांगितले.

सकाळी ६ वाजता हॉटेल सॅफ्रॉन येथून वॉकेथॉनला सुरुवात होऊन मार्गक्रमण छत्रपती शिवाजी महाराज पुतळा सराफा मार्केट टांगा स्टँड राम मंदिर मशीन हॉस्पिटल रोड रुख्मिणी गार्डन मार्गे पुन्हा सॅफ्रॉन हॉटेल येथे समाप्त होणार आहे. कार्यक्रमादरम्यान कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास त्यासाठी वैद्यकीय पथकाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच सहभागी महिलांसाठी झुंबा प्रशिक्षक सोनल थाराणी यांच्याकडून विशेष सत्र आयोजित करण्यात येणार आहे. कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या सर्व महिलांना पदक देऊन गौरविण्यात येणार आहे.

या उपक्रमाला हिरवी झेंडी दाखविन्याकरीता जालना महापौर श्रीमती वंदनाताई मगरे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम., मा. नागराध्याक्षा सौ. संगीताताई गोरंट्याल, सौ. सीमाताई खोतकर व सौ. दर्शना खोतकर झोल यांची उपस्थिती अपेक्षित आहे.

पत्रकार परिषदेस डॉ. सुरेश साबू, गौरव करवा, विवेक मणियार यांच्यासह रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. आभार प्रदर्शन क्लबचे सचिव पंकज लड्डा यानी केले.

# राज्य परिवहन महामंडळाकडून पात्र दिव्यांगांची गैरसोय थांबवावी- अशोक तनपुरे

**परतूर । प्रतिनिधी -** केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी दिव्यांगासाठी विविध कल्याणकारी योजना राबवीत असताना त्या कागदपत्रीच आहेत का असा प्रश्न निर्माण होतो.

तसेच आता राज्य परिवहन महामंडळाकडून प्रवासादरम्यान प्रवास सवलतीमध्ये विनाकारण आर्थिक व मानसिक त्रास दिल्या जात आहे.

दिव्यांग कल्याण आयुक्तालय पुणे यांनी जे पात्र दिव्यांग आहेत अशांनाच यूडी आयडी कार्ड म्हणजे (वैश्विक कार्ड) केंद्र सरकारच्या व राज्य सरकारच्या योजना दिव्यांगांना सुलभ आणि गैरसोय होऊ नये यासाठी दिव्यांग कल्याण आयुक्तालय पुणे यांनी पात्र दिव्यांगांना केंद्र सरकार व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा म्हणून युडी आयडी ( वैश्विक कार्ड) कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये म्हणून समाज कल्याण कार्यालय मार्फत वितरित करण्यात आले आहे

पण दिव्यांगांना प्रवासादरम्यान पात्र असून सुद्धा राज्य परिवहन महामंडळाकडे असलेले ॲपवर युडी आयडी स्कॅन होत नाही म्हणून काही दिव्यांगांना राज्य परिवहन महामंडळाकडून सवलत नाकारली जात आहे. आणि फुल टिकीट घेतले जात आहे. हे यूडीआयडी कार्ड पात्र दिव्यांगानाच देण्यात आलेले आहे. यामुळे दिव्यांग कल्याण आयुक्तालय पुणे यांनी हे यूडी आयडी कार्ड बनावट दिले आहे का असा प्रश्न निर्माण होतो.

राज्य परिवहन महामंडळाकडे जी स्कॅन करण्याची मशीन आहे ती स्कॅन होत नसेल याला जबाबदार कोण म्हणून राज्य परिवहन महामंडळाने विनाकारण प्रवासादरम्यान त्रास देणे म्हणजे दिव्यांग आयुक्त पुणे यांचा आवमान असून दिव्यांगांना आर्थिक व मानसिक त्रास दिला जात आहे. तरी राज्य परिवहन महामंडळाने पात्र दिव्यांगांना विनाकारण त्रास देऊन दिव्यांगाची गैरसोय होऊ नये याची दक्षता घ्यावी. नसता

प्रहार संघटनेच्या वतीने राज्य परिवहन महामंडळ यांच्या कार्यालयावर आंदोलनाचा इशारा प्रहार संघटनेचे अशोक तनपुरे यांनी प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून दिला आहे.

# कारमधून जाणारा ४९,३१४ रुपयांचा गुटखा जप्त : मंठा पोलिसांची कारवाई



**मंठा । प्रतिनिधी -** अवैधरीत्या गुटखा घेऊन जाणारी कार मंठा पोलिसांनी तळणी फाटा येथे पकडली. पोलिसांनी कारसह ४९,३१४ रुपयांचा गुटखा असा एकूण ३ लाख ४९ हजार ३१४ रुपयांचा गुटखा जप्त केला. या प्रकरणी रवि जाधव यांच्या फिर्यादीवरून संशयित योगेश महादेव अवचार, आकाश अग्रवाल यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

वाटूर फाट्याकडून मंठ्याकडे एक इसम अवैधरीत्या गुटखा घेऊन मंठ्याकडे येत असल्याची माहिती मंठा पोलिसांना मिळाली. या माहितीवरून पोलिसांनी तळणी फाटा येथे सापळा लावून वाटूर फाट्याकडून मंठ्याकडे येणाऱ्या कारला थांबवले.

कारची पाहणी केली असता, त्यात ४९,३१४ रुपयांचा गुटखा दिसून आला. कारचालक योगेश महादेव अवचार (२६ रा. विडोळी, ता. मंठा) याला ताब्यात घेतले. त्याने सदरील गुटखा हा आकाश अग्रवाल (रा. वाटूर, ता. परतूर) याच्याकडून आणल्याचे सांगितले. याप्रकरणी दोघांवर मंठा ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# घरकुलाची देयके रखडली

## जाफराबाद पंचायत समिती; बंद दालनाला हार घालून ‘आप’चा निषेध; चौकशीची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जाफराबाद तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांची देयके रखडल्याच्या मुद्द्यावरून आम आदमी पार्टीने पंचायत समिती कार्यालयात जोरदार निषेध आंदोलन केले. शासनाने नेमून दिलेल्या भेटीच्या वेळेत गटविकास अधिकाऱ्यांचे दालन बंद असल्याचा आरोप करत आप कार्यकर्त्यांनी बंद दरवाजाला हार घालून निषेध व्यक्त केला. तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई न झाल्यास उग्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला.

मिळालेल्या माहितीनुसार, ६ मार्च रोजी जाफराबाद पंचायत समिती कार्यालयात तालुक्यातील विविध योजनांअंतर्गत मंजूर झालेल्या घरकुलांच्या रखडलेल्या बिलांबाबत (चेक) विचारणा करण्यासाठी आम आदमी पार्टीचे जालना तालुका अध्यक्ष सुभाष बोर्डे आणि घरकुल लाभार्थी कार्यालयात गेले होते. मात्र शासनाने ठरवून दिलेल्या वेळेतही गटविकास अधिकारी देविदास मगर यांच्या दालनाला कुलूप लावलेले असल्याचे त्यांना आढळून आले.

याचप्रमाणे पंचायत समितीतील घरकुल विभागालाही कुलूप असल्याचा आरोप करण्यात आला. त्यामुळे लाभार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली. या प्रकाराचा निषेध म्हणून आम आदमी पार्टीच्या वतीने बंद असलेल्या दालनाच्या दरवाजाला हार घालून आंदोलन करण्यात आले. यावेळी बोलतांना सुभाष बोर्डे यांनी सांगितले की, जाफराबाद तालुक्यातील अनेक घरकुल लाभार्थ्यांची देयके अद्यापही अदा झालेली नाहीत. वारंवार संपर्क साधूनही अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तर मिळत नसल्याचा आरोप त्यांनी केला. फोनवर विचारणा केल्यास ‘डी एस सी मुळे देयके थांबली आहेत’ असे सांगितले जात असल्याचेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, लाभार्थी प्रत्यक्ष कार्यालयात गेल्यावर गटविकास अधिकाऱ्यांचे दालनच बंद असल्याने प्रशासनाच्या कारभाराबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. लाभार्थ्यांनी आपले प्रश्न मांडायचे तरी कुणाकडे? असा संतप्त सवाल उपस्थित करत देविदास मगर तसेच नव्याने नियुक्त गटविकास अधिकारी श्री. गायकवाड यांच्या कामकाजाची




विभागीय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. या संदर्भात जिल्हा परिषद जालना येथील मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लेखी निवेदन देण्यात आले असून, रखडलेली घरकुल देयके तात्काळ अदा करावीत आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास आम आदमी पार्टीच्या वतीने पंचायत समिती जाफराबाद येथे तीव्र आणि उग्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. या आंदोलनावेळी आम आदमी पार्टीचे जालना तालुका अध्यक्ष सुभाष बोर्डे यांच्यासह जाफराबाद तालुक्यातील घरकुल लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उन्हाच्या तीव्रतेमुळे ग्रामीण भागातील शाळा सकाळच्या सत्रात भरविण्याची प्राथमिक शिक्षक संघाची मागणी



**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये तीव्र उन्हामुळे विद्यार्थ्यांना होणारा त्रास लक्षात घेता,प्राथमिक शिक्षक संघाने शाळेच्या वेळेत बदल करण्याची मागणी केली आहे.संघाने शाळा सकाळी ७:३० ते ११:३० या वेळेत भरावी,अशी विनंती केली आहे.ग्रामीण भागातील बहुतांश शाळा टिनशेड(टिन पत्र्याच्या छताच्या) असल्याने वर्गखोल्यांमध्ये उष्णता प्रचंड वाढते.याशिवाय अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई असल्याने विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधांची कमतरता भासते.यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून,शैक्षणिक प्रगतीवरही नकारात्मक प्रभाव पडण्याची शक्यता आहे.राज्यातील इतर जिल्ह्यांमध्येही तीव्र उन्हाळ्यात अशा प्रकारे शाळांच्या वेळेत बदल करण्यात आले आहेत,असे संघाने नमूद केले आहे.

# रसायन मुक्त अन्नधान्यासाठी शेतीला दुग्ध व्यवसायाची जोड द्यावी - राज्यपाल बागडे

## कृषिरत्न विजय अण्णा बोराडे यांचा ‘‘जालना गौरव‘‘ पुरस्काराने सन्मान

**जालना । प्रतिनिधी -** जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार आठ माणसामागे एक कॅन्सरचा रुग्ण आढळतोय,आज प्रत्येकाला रसायनमुक्त भाजीपाला, अन्नधान्य हव आहे. शेतीची खरी मशागत बैलाने होत असून ट्रॅक्टरने नाही. राजस्थान राज्यात बैल पाळणाऱ्या शेतकऱ्यांना शासन वर्षाकाठी ३० हजार रुपये देते.

वाटण्यांमुळे शेतीचे तुकडे , पारंपारिक पशु उत्पादक शेती सोडून रासायनिक फवारण्यांचा मारा यामुळे उत्पादन आणि जमिनीचा पोत कमी होत आहे. दूध व्यवसायात भारत देश जगात पहिल्या क्रमांकावर असून शेतकऱ्यांनी उत्पन्न वाढीसाठी दुग्ध व्यवसाय वाढवला पाहिजे, जनावरांची वाढ झाली तर शेणखत मिळून रसायनांची गरज पडणार नाही. असे मत राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी व्यक्त केले.

जालना ज्येष्ठ नागरिक मंच, ज्येष्ठ नागरिक महिला मंच आणि शेतकरी मंच जिल्हा जालना यांच्या संयुक्त विद्यमाने कृषीरत्न विजयअण्णा बोराडे यांना राज्यपाल बागडे यांच्या हस्ते ‘‘जालना गौरव‘‘ पुरस्कार प्रदान करण्यात आला. शुक्रवारी ( ता.०६) जे.ई.एस. महाविद्यालयाच्या सभागृहात झालेल्या सन्मान सोहळ्यास महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक संघटनेचे उपाध्यक्ष अशोक तेरकर, महिला आघाडी अध्यक्ष प्राचार्य डॉ. निर्मलाताई भोसकर- कोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

राज्यपाल बागडे यावेळी म्हणाले, शेती आणि शेतकऱ्यांना पाणी, वीज महत्त्वाचे असून विजयअण्णा बोराडे यांनी पाणलोट क्षेत्रात भरीव कार्य करत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवले. जलयुक्त शिवार जिथे प्रभावीपणे राबवण्यात आली, त्या गावांना फायदा झाल्याचे त्यांनी सांगितले.

बौद्धिक क्षमता, तंत्रज्ञान भारतात पूर्वीपासून होते पण केवळ ग्रंथातच राहिले. आज विद्यार्थी दहावीपर्यंत पास होतात पण पाया मजबूत होत नाहीत कॉपीमुक्त परीक्षा साठी विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता वाढवण्यावर शिक्षक, प्राध्यापकांनी प्रयत्न करावेत तेव्हाच चांगली दृष्टी, माणुसकी, सभ्यता असलेला माणूस निर्माण



होईल. असा विश्वास राज्यपाल बागडे यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविकात मंचचे सचिव प्रा. राजकुमार बुलबूले यांनी ज्येष्ठ नागरिकांचे आयुष्य वाढावे, आनंदी जीवन जगण्याचा आस्वाद घेता यावा, यासाठी जालना जेष्ठ नागरिक मंचातर्फे राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

अशोक तेरकर,डॉ. निर्मलाताई भोसकर- कोरे यांची समायोचित भाषणे झाली.

यावेळी विजय अण्णा बोराडे यांच्या कार्य गौरवावर आधारित चलचित्र फित दाखविण्यात आली.

सूत्रसंचालन मंचचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ .रावसाहेब ढवळे यांनी केले तर जेष्ठ सदस्य प्रकाश गडवे यांनी आभार मानले.

कार्यक्रमास खा.डॉ. कल्याण काळे , माजी आ.कैलास गोरंट्याल व विलास खरात , व्दारकाभाऊ पाथ्रीकर , बॅ.गांधी,नानासाहेब देशमुख , राजाभाऊ देशमुख ,भास्कर अंबेकर , सुनील रायठठ्ठा यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर , जेष्ठ नागरिक , महिला भगिनी आणि शेतकरी बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली . कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जालना ज्येष्ठ नागरिक मंच, ज्येष्ठ नागरिक महिला मंच आणि शेतकरी मंच जिल्हा जालनाच्या पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

**समाजकार्यात लोकांची मदत मिळाली - बोराडे**

कुटुंबात राजकारण, समाजकारणाचा वारसा मिळाला असला तरी राजकारणात अपघात झाले .राजकारणात आपले मन रमले नाही. परिणामी कुटुंबाचे राजकारण आपण पुढे नेऊ शकलो नाही .मात्र समाजकारणात अवतीभोवतीच्या सर्वांनीच मदत केली असून हा सत्कार सामूहिक प्रयत्नांचा आहे. अशा भावना व्यक्त करत सत्काराने पाय वर जातात आपण जमिनीवर आहोत. तथापि ज्येष्ठ नागरिकांनी केलेल्या सत्काराबद्दल विजय अण्णा बोराडे यांनी समाधान व्यक्त केले.

# खुद्द जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांना वाहतुक कोंडीचा बसला फटका

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील वाहतुकीचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. शहरात वाढलेल्या अतिक्रमणामुळे आणि विस्कळीत नियोजनामुळे सामान्य नागरिकच नव्हे, तर खुद्द जिल्ह्याच्या प्रशासकीय प्रमुख, जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनाही गुरुवारी वाहतूक कोंडीचा मोठा फटका बसला. रेल्वे स्थानक आणि टिपू सुलतान चौक परिसरात झालेल्या भीषण कोंडीत जिल्हाधिकाऱ्यांचे वाहन तब्बल अर्धा तास अडकून पडले होते.



जालना मनपाच्या आयुक्तपदाचा अतिरिक्त पदभार असलेल्या अशिमा मित्तल या महानगरपालिकेची बैठक संपवून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे परतत होत्या. दुपारी रेल्वे स्थानक आणि टिपू सुलतान चौक परिसरात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. या भागात जवळपास दोन तास वाहतूक ठप्प झाली होती. यात जिल्हाधिकाऱ्यांचे वाहन अडकल्याने काही काळ गोंधळ उडाला. अखेर जिल्हाधिकाऱ्यांच्या अंगरक्षकाने वाहनातून खाली उतरून स्वतः वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले. त्यानंतर अर्ध्या तासाने जिल्हाधिकाऱ्यांचा मार्ग मोकळा झाला आणि त्या कार्यालयाकडे रवाना झाल्या.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.